# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः18.05.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात 69 पूर्णांक 16 शतांश टक्के मतदान झाल्याची सुधारित आकडेवारी जाहीर
2. पाचव्या टप्प्यातील प्रचार आज समाप्त. परवा म्हणजे सोमवारी मतदान
3. चाबहार बंदराकडे अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांसाठी संपर्क केंद्र म्हणून पाहत असल्याचं भारताचं स्पष्टीकरण
4. हरियाणामध्ये बसला लागलेल्या आगीत 8 जणांचा मृत्यू आणि
5. नैऋत्य मान्सून या महिन्याच्या अखेरीस केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता.

**<u>निवडणूक-आकडेवारी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात 69 पूर्णांक 16 शतांश टक्के मतदान झालं आहे. निवडणूक आयोगानं ही सुधारित आकडेवारी काल जाहीर केली. या आकडेवारीनुसार, चौथ्या टप्प्यात पुरुष मतदारांचं प्रमाण 69 पूर्णांक 58 शतांश टक्के, तर महिला मतदारांचं प्रमाण 68 पूर्णांक 76 शतांश टक्के इतकं आहे. तृतीयपंथी मतदारांचं प्रमाण 34 पूर्णांक 23 शतांश टक्के इतकं आहे. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या 96 मतदारसंघांमध्ये मतदान झालं. एक हजार 717 उमेदवार या टप्प्यात निवडणुकीच्या रिंगणात होते.

**<u>पाचवा टप्पा</u>**

दरम्यान, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात 13 मतदारसंघासाठी सोमवारी म्हणजे 20 मे रोजी मतदान होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. या टप्प्यातील मतदानासाठी 24 हजार 579 मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या 13 मतदारसंघांत 2 कोटी 46 लाख 69 हजार 544 मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तसंच 264 उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व पात्र मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावून मतदानाची टक्केवारी वाढवावी, असं आवाहन चोक्कलिंगम यांनी केलं.

**<u>मोदी सभा</u>**

यंदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी विक्रमी जागा जिंकेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत व्यक्त केला. मुंबईच्या सहा लोकसभा मतदारसंघातील एनडीएच्या उमेदवारांसाठी शिवाजी पार्क मैदानावर घेतलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. देशाला 2047 पर्यंत विकसित करण्यासाठी आठवड्याचे सातही दिवस 24 तास कार्यरत आहे आणि सर्वसामान्य माणसांचं आयुष्य सुकर करण्यालाच आपलं प्राधान्य आहे, असं मोदी म्हणाले. शांतता, सुरक्षा, मुलांचं उज्ज्वल भविष्य आणि भारताला जगात सन्मान मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचं आवाहन त्यांनी मतदारांना केलं. मुंबई हे स्वप्नांचं शहर असल्याचं सांगून त्यांनी मुंबईला तिच्या हक्काच्या योजना देण्याची ग्वाही दिली. भारताबरोबरच स्वतंत्र झालेले अनेक देश पुढे गेले, पण यापूर्वीच्या सरकारांनी भारतीयांच्या क्षमतेवर विश्वास ठेवला नाही, अशी टीका त्यांनी केली. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधी यांच्या सल्ल्यानुसार कॉंग्रेस विसर्जित झाली असती, तर देश पन्नास वर्षं पुढं गेला असता असंही ते म्हणाले. सभेला

येण्यापूर्वी त्यांनी चैत्यभूमीवर जाऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि सावरकर स्मारकावर जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केलं. सभा संपल्यावर त्यांनी शिवाजी पार्कवरच्या बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला अभिवादन केलं.

**महाविकास आघाडी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेलं संविधान कोणत्याही परिस्थितीत अबाधित ठेवलं जाईल आणि इतर काही देशांत जशी अवस्था झाली आहे तशी भारताचे नागरिक कधीही होऊ देणार नाहीत, असं प्रतिपादन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल मुंबईत केलं. बीकेसी मैदानावर इंडिया महाविकास आघाडीच्या परिवर्तन सभेत ते बोलत होते. केंद्र सरकार सक्तवसुली संचालनालय, केंद्रीय अन्वेषण विभाग आणि प्राप्तिकर विभाग यांचा वापर विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी करत आहे, असा आरोप त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देशात संसदीय लोकशाही टिकून राहण्यासाठी इंडिया आघाडीला मतदान करण्याचं आवाहन केलं. स्वातंत्र्यानंतर या देशात झालेल्या निवडणुका या देशाच्या भविष्यासाठी होत्या, पण या वेळची निवडणूक ही संविधान आणि लोकांचे हक्क वाचवण्यासाठी आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**केजरीवाल**

सर्वोच्च न्यायालयाने काल दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कथित अबकारी घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील निकाल राखून ठेवला. परंतु त्यांना नियमित जामिनासाठी ट्रायल अर्थात मूळ अधिकार क्षेत्रातील न्यायालयात जाण्याची मुभा दिली आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने हा निर्णय राखून ठेवला. केजरीवाल यांना 21 मार्च रोजी अटक करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी 10 मे ते 1 जून या कालावधीत अंतरिम जामीन मंजूर केला असून 2 जून रोजी हजर होवून पुन्हा कारागृहात जाण्याचे आदेश दिले आहेत.

**आयआयटी दिल्ली**

आयआयटी दिल्लीच्या, अबुधाबीतील केंद्रासाठी 2024-25 या पहिल्याच शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. संयुक्त प्रवेश परीक्षा म्हणजे जेईई किंवा मिश्र प्रवेश परीक्षा चाचणी म्हणजे सीएईटीच्या मार्फत विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. आयआयटी दिल्लीचं परदेशातलं हे पहिलंच केंद्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या वर्षीच्या अबुधाबी दौऱ्यात अबुधाबी शिक्षण विभाग, भारत सरकार आणि आयआयटी दिल्ली यांच्यामध्ये हे केंद्र उभारण्याबाबतचा करार झाला होता.

**चाबहार**

भारत चाबहार बंदराकडे अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांसाठी संपर्क केंद्र म्हणून पाहत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल दिल्लीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितलं की, भारत आणि इराणमधील दीर्घकालीन करार ही अतिशय महत्त्वाची घडामोड आहे आणि या बंदराच्या माध्यमातून भारत; अफगाणिस्तानला बरीच मानवतावादी मदत देऊ शकला आहे. अफगाणिस्तानला मानवतावादी दृष्टीकोनातून विविध गोष्टींचा पुरवठा सुरू ठेवण्यासाठी चाबहार बंदराचं महत्त्व अमेरिकेलाही लक्षात येत असल्याच्या मुद्द्यावर जयस्वाल यांनी भर दिला.

**कंबोडिया**

परराष्ट्र मंत्रालयानं कंबोडिया आणि दक्षिण पूर्व आशियाई प्रदेशात नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांना बनावट मध्यस्थापासून सावध राहण्यास सांगितलं आहे. कंबोडिया आणि लाओसमधील भारतीय दूतावासांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार या प्रदेशात कार्यरत असलेले अनेक बनावट मध्यस्थ भारतातील मध्यस्थांना विशेषत: सायबर गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या कंपन्यांना गैरव्यवहार करण्याचे आमिष दाखवत आहेत. कंबोडियामध्ये नोकरी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने परराष्ट्र मंत्रालयानं मंजूर केलेल्या अधिकृत मध्यस्थामार्फतच काम करावं असंही या पत्रकात म्हटलं आहे. अलीकडेच भारतीय नागरिकांना थायलंडमधून लाओसमध्ये नोकरीचे आमिष दाखवले जात असल्याची उदाहरणेही समोर आली आहेत.

**<u>मित्तल</u>**

शाश्वत विकासासाठी संपूर्ण पुरवठा साखळी, अर्थव्यवस्था आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असल्याचं प्रतिपादन दूरसंचार विभागाचे सचिव डॉ नीरज मित्तल यांनी केलं आहे. काल नवी दिल्ली इथं जागतिक दूरसंचार आणि माहिती समाज दिना निमित्त आयोजित परिषदेत ते बोलत होते. शाश्वत विकास साधण्यासाठी दूरसंचार हा अविभाज्य घटक आहे आणि देशात दूरसंचारचे मजबूत जाळे असण्यावर मित्तल यांनी भर दिला. 2025-26 पर्यंत भारतात डिजिटल अर्थव्यवस्था अंदाजे दीड अब्ज डॉलर्स होईल आणि जीडीपीच्या 15 टक्के असेल. शाश्वत डिजिटल विकासावरील गोलमेज चर्चेत 30हून अधिक उद्योग नेते, उत्पादक आणि स्टार्ट-अप सहभागी झाले.

**<u>कान</u>**

माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी फ्रान्समधील 77 व्या कान चित्रपट महोत्सवात 55 व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या अधिकृत फलकाचं अनावरण केलं. इफ्फी हा महोत्सव यावर्षी नोव्हेंबरमध्ये गोव्यात होणार आहे. जाजू यांच्यासह, चित्रपट निर्माते अशोक अमृतराज, रिची मेहता, गायक शान, अभिनेता राजपाल यादव आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. कान चित्रपट महोत्सवात भारतानं पहिल्यांदाच भारत पर्व आयोजित केलं आहे.

**<u>सोने</u>**

मुंबई विमानतळ आयुक्तालयाच्या सीमाशुल्क विभागानं छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर पाच विविध प्रकरणांमध्ये जवळपास साडेअकरा किलो सोनं आणि 7 कोटी 16 लाख रुपयांच्या सिगारेट जप्त केल्या. मेणात लपवलेली सोन्याची पावडर, कच्च्या स्वरूपातील दागिने, रोडियमचा थर असलेले दागिने आणि सोन्याच्या पट्ट्या इत्यादि वस्तू विविध रूपांमध्ये लपवून ठेवलेल्या आढळल्या. या प्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. दुबई, अबुधाबी, जेद्दाह, कैरो, दोहा, हाँगकाँग, क्वालालंपूर, कुवेत आणि मस्कत येथून प्रवास करणाऱ्या बावीस भारतीय नागरिकांना ताब्यात घेण्यात आलं असून त्यांच्याकडे 8 हजार 575 ग्रॅम सोनं आढळून आलं.

**<u>बस-आग</u>**

हरियाणा मधील नुह इथं चालत्या बस ला आग लागून 8 जणांचा मृत्यू झाला असून 24 हून अधिक लोक जखमी झाल्याचं वृत्त आहे. बस मध्ये 60 हून अधिक लोक प्रवास करत होते. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**<u>मॉन्सून</u>**

नैऋत्य मान्सून या महिन्याच्या अखेरीस केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामानशास्त्र विभागानं म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून केरळमध्ये ठिकठिकाणी तुरळक पाऊस पडत असून त्यामुळं तापमानात कमालीची घट झाली आहे. हवामान विभागानं मलप्पुरम आणि वायनाड जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. तसंच तिरुअनंतपुरम, कोल्लम, पथनमथिट्टा, इडुक्की, कोट्टायम आणि एर्नाकुलमसह इतर 10 जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.